# वर्धा नगर परिषद,वर्धा

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ४५ आणि**

**महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम,१९६५ चे कलम १८९ (४) अन्वये याव्दारे**

क्रमांक: २००१ /बांध/नर/नपव/१८

दिनांक २५/१/०१८

प्रति,

श्री.हरिष सुधाकरराव शेंडे,

बेद ले-आऊट,

वर्धा.

**विषय :-** इमारत बांधकाम मंजुरी बाबत.

**संदर्भ :-** आपला बांधकाम परवानगी बाबत प्रस्ताव क्रमांक २०३,दि.२१/०९/२०१७.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय अर्जान्वये दाखल झालेल्या प्रस्तावानुसार तपासणी अंती वर्धा येथिल भुखंड क्रं.१९ व २०,सर्वे क्रं.३६,मौजा वर्धा,भुखंडाचे क्षेत्रफळ ६६९.१३५ चौ.मी.इमारत बांधकाम क्षेत्र ६६८.९१२ चौ.मी. रहिवासी इमारत बांधण्याकरिता खालील अटीवर मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

१) समोरील तसेच ,मागील व भुखंडाचे दोही बाजुंनी प्रत्येकी अंमलबजावणी करिता सोडावयास लागणा-या नियमाचे अंमलबजावणीकरिता म्हणून रिकामी झालेली जागा सोडावयाची समास अंतरे ही सार्वजनिक रस्त्याचा भाग असेल.

२) कोणत्याही इसमास राहण्याचे प्रमाणपत्र प्राप्त होईपर्यत नविन इमारत अथवा तिचा भाग राहण्याकरिता/उपयोग अथवा राहण्याकरिता परवानगी घेतलेली/उपयोगी होण्याकरिता नसेल.

३) आरंभ प्रमाणपत्र/इमारत परवाना हे परवाना पत्र मिळालेल्या दिनांकापासुन एक वर्षाकरिता अनुज्ञेय राहील.

४) जी जमीन अर्जदाराच्या मालकीची नसेल ती विकसीत करण्यासाठी परवागी अधिकार राहणार नाही.

५) नकाशा मंजुर केल्याप्रमाणे/ लाल रंगाने त्यात दुरुस्त्या सुचविल्याप्रमाणे आपल्या घरास/भुखंडास लागुन असणा-या विद्यमान इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावित घराचे/इमारतीचे बांधकाम असावयास पाहिजे.

६) न्हाणी व संडास,स्वयंपाकगृह इत्यादीचे सांडपाणी,घाणपाणी व कचरा यांची तांत्रिकदृष्टया योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

७) अर्जदारास मंजुर नकाशा व्यतिरिक्त त्यात फेरबदल करावयांचे असल्यास नगरपालिकेची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

८) बांधकाम परवानगी प्रमाणे प्लींथ लेव्हल पर्यतचे बांधकाम कामे नगरपालिका कडुन तपासणी झाल्याशिवाय पुढील बांधकाम करु नये.

९) बिना परवागी बांधकाम साहित्य,मलमा सार्वजनिक जागेवर किंवा रस्त्यावर टाकू नये,तसे आढळल्यास आपणावर दंडात्मक वा साहीत्य जप्तीची कार्यवाही करण्यांत येईल.

१०) लेआऊट टाकल्यानंतर खोदकामापुर्वी नगरपालिकेचे सक्षम अधिका-याकडून तपासणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र दिल्याशिवाय खोदकाम सुरु करु नये.वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघा केल्यास होणा-या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी मिळकत धारकाची राहील.

११) भविष्यात नगर पालिकेला नाली करता जागा लागल्यास ती समास अंतरातून विनामुल्य ... गेल.

SUB-REGISTRAR Gr-2 WARDHA

वर्धा-२
WRD - 2
६२३१/१८
२८/८२

Scanned by CamScanner

१२) मंजुर अभियास/रेकार्ड प्रमाणे जागेची आखणी करुन घेण्याची व मालकी हक्काची सर्वस्वी
अर्जदाराची आहे.नगर पालिकेची जबाबदारी राहणार नाही.

१३) बिना अनुज्ञेय बांधकाम अर्जदाराने स्वत: दोन महिण्याचे आत पाडुन टाकावे अन्यथा
कोणतीही नोटीस न देता पाडून टाकेल ,होणा-या नुकसानीस अर्जदार स्वत: जबाबदार राहील
खर्च नगर परिषद वसुल करेल.

१४) पिण्याचे पाण्याची उपलब्धता वाढविणेबाबतचे स्त्रोत बळकटी करण्याकरिता दिलेल्या योजनेप्रमाणे
करावी.अयथा आपणास इमारत वापर परवाना मिळणार नाही.

१५) रुफस्टॉप रेन वॉटर हार्वेस्टींगची व्यवस्था प्रमाणित करावी तसेच सौर उर्जेवर पाणी
पध्दतीचा वापर करावा.

१६) भूकंप प्रतिबंधक उपयोजना करुन (नोंदणीकृत स्ट्रक्चरल) इंजिआर कडून आर.सी.सी.डिझाईन
व तसे प्रमाणपत्र नगर परिषद कडे सादर करणे बंधनकारक राहील.तसेच सदर इमारतीचा पूर्णत्वाचा
घेण्यापुर्वी Structural Stability बाबत प्रमाणपत्र सादर करणे बंधाकारक राहील.

१७) महाराष्ट्र अग्निशमन अधिनियम २००६ व नियम २००९ नुसार प्रत्यक्ष साईटवर अग्निशमन
दयावी लागेल.तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडुन प्राप्त करुन संबंधितास सादर
बंधाकारक राहील.

१८) चांगल्या दर्जाची फ्लॅश ॲश विट चा वापर बांधकामाकरिता करणे आवश्यक आहे.

१९) इमारतीवर मोबाईल टॉवरचे बांधकाम परवागी शिवाय करता येणार नाही.

२०) बांधकाम पुर्ण झाल्यानंतर आवेदकाने इमारत बांधकाम पुर्णताचे (Complectiont cer
प्रमाणपत्र देवुन न.प.कडुन Occupancy certificate घेणे आवश्यक आहे.

२१) इमारतीच्या प्रत्येकी १० मीटर अंतरावर १ वृक्ष असे एकुण २ वृक्ष तसेच समोरील रस्त्याचे
रोपण करणे त्याची देखभाल करणे बंधाकारक आहे.

## सुचना

१) संदर्भाधिन इमारत परवाना व आरंभ प्रमाणपत्राची मुदत आपणांस प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या
एक वर्ष पावेतो वैद्य आहे.अर्जदारास मुदतीचे अगोदर पुढील एक वर्षाचे नुतानीकरण करण्याचे
नमुन्यात नगरपालिकेत अर्ज करणे आवश्यक आहे.

२) आपण नगरपालिकेत जमा केलेली अमानत रक्कम मंजुर नकाशात प्रारंभ प्रमाणपत्रातील
बांधकाम करणार असल्याची पावती देणे अन्यथा,नगर पालिकेचे पूर्व परवानगी शिवाय आपण
केलेले फेरबदल इत्यादी आपली अनामत रक्कम नगरपालिकेचे खाती वळती/जमा होईल.

३) नगरपालिकेने मंजुर केलेल्या बांधकामातील पूर्व परवानगी न घेता केलेले फेरबदल
अनधिकृत राहतील, त्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ आणि महाराष्ट्र
अधिनियम,१९६५ चे अंतर्गत असणाऱ्या तरतुदीनूसार कायदेशिर कार्यवाहीस्तव प्रस्तावित करण्यात
कायदेशिर कार्यवाही करण्यांत येईल.

कार्यालयाचा शिक्का :

16/1/18 नगर परिषद

ओदश क्रमांक:-
दिनांक :-
सहपत्र :१) मंजुर बांधकाम नकाशाची १ प्रत
२) सूचना फलकावर नमुद करावयाच्या माहितीचे पत्रक.
प्रत माहितीस्तव सादर.
१) कर अधिक्षक,नगर परिषद,वर्धा यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव

वरद-1 WRD 023196 32182

Scanned by CamScanner